# निविदा सूचना

| सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक विभाग नाशिक | | | | |
|---|---|---|---|---|
| आ.क्र. | पदाचे नाव | भरावयाचे पदसंख्या | पदाचे स्वरूप | शैक्षणिक अर्हता |
| 1 | शिपाई | 3 | कंत्राटी स्वरुपात (करार तत्वावर) पूर्णवेळ अकुशल पद | बारावी उत्तीर्ण, पदवीधर असल्यास प्राधान्य<br>चार चाकी वाहन चालविण्याचा परवाना असल्यास प्राधान्य |
| 2 | वाहनचालक | 1 | कंत्राटी स्वरुपात (करार तत्वावर) पूर्णवेळ कुशल पद | बारावी उत्तीर्ण पदवीधर असल्यास प्राधान्य, वाहन चालविण्याचा परवाना (किमान हलके चार चाकी वाहन) |

सदरील निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती ठरविण्यात आलेल्या आहेत.

1) निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे सांक्षांकित असावेत.
2) खाजगी कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनेची रक्कम प्रचलित दरानुसार मुख्य मालक म्हणून या कार्यालयातर्फे आपल्या दरात समाविष्ठ करून त्याचा भरणा संबंधित कार्यालयात केल्याची पावती या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
3) खाजगी कर्मचाऱ्याची वयोमर्यादा कमीत कमी 18 वर्षे व जास्तीत जास्त 45 वर्षे राहील.
4) खाजगी कर्मचाऱ्याचे शिपाई या पदाकरिता 12 उत्तीर्ण, पदवीधर असल्यास प्राधान्य चार चाकी वाहन चालविण्याचा परवाना असल्यास प्राधान्य याप्रमाणे निकष राहील.
5)खाजगी कर्मचाऱ्याचे वाहनचालक या पदाकरिता 12 उत्तीर्ण, पदवीधर असल्यास प्राधान्य, वाहन चालविण्याचा परवाना (किमान हलके चार चाकी वाहन) याप्रमाणे निकष राहील.
6) व्यसनाधीन गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या खाजगी कर्मचाऱ्यास नियुक्ती देता येणार नाही. त्याबाबतीत कर्मचाऱ्यांना नियुक्ती देण्यापूर्वी चरित्र पडताळणी करून घेणे बंधनकारक राहील.
7) बेशिस्त वर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यास या कार्यालयाने निर्देशित केल्यावर त्वरित काढून टाकले जाईल.
8) खाजगी कर्मचाऱ्यांना साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक राहील. किमान वेतनामध्ये साप्ताहिक सुट्टीचा समावेश असेल.
9) खाजगी कर्मचाऱ्यांना अपघात झाल्यास खर्चाची पूर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

राहील.

10) नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यास मिळणारे कोणतेही फायदे, सुविधा कंत्राटी कर्मचाऱ्यांना देय असणार नाही.

11) कुठलेही कारण न देता कुठल्याही वेळी कंत्राट रद्द करण्याचे सर्व अधिकार धर्मादाय सह आयुक्त, नाशिक यांना असतील.

12) ठेकेदार/ कंपनी / संस्थेतर्फे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व या कार्यालयावर राहणार नाही.

13) बाह्ययंत्रणेव्दारे निविदा प्रक्रियेला प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झाल्यावर कंत्राटदारास लेखी करार करावा लागेल.

14) उपरोक्त पदाच्या सेवेसाठी प्रत्येक माणसाकरिता आकारण्यात आलेला दर हा किमान वेतन कायदा 1948 प्रमाणे असावा. तसेच नियमितपणे पद निर्मित केली असता जितका खर्च आला असता त्या खर्चाच्या कमीत कमी 20 ते 30 टक्के बचत होईल अशा पद्धतीने प्रत्येक पदासाठी मानधन कंत्राटदाराने ठरवावे.

15) निविदा अर्ज पांढऱ्या कागदावर टंकलिखित करून ज्या पदासाठी निविदा भरण्यात येत आहे, त्या पदाचे नाव "**शिपाई पदासाठी निविदा**" / "**वाहनचालक पदासाठी निविदा**" असे ठळक अक्षरात नमूद करावे. वरील सर्व पदाच्या सेवेसाठी प्रत्येक माणसाकरिता आकारण्यात आलेला दर नमूद करणे आवश्यक आहे तसेच निविदेसोबत संस्था / कंपनी / एजन्सी शासनमान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.

16) सदरील निविदा सूचना (http://Charity.maharashtra.gov.in ) संकेतस्थळावरप्रसिद्ध करण्यात आली आहे.

13-1-25

(म. ला. जोगी)
धर्मादाय उप आयुक्त,
नाशिक विभाग, नाशिक

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

# शिपाई , वाहनचालक या पदासाठी कंत्राटी पद्धतीने घेणेबाबत निविदा प्रक्रिया कार्यक्रम

| अ. क्र. | तपशील | दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | जाहीर निविदा सूचना काढणे | 15/01/2025 | |
| 2 | जाहीर नोटीस प्रसिद्ध करणे (कार्यालयीन नोटीस बोर्ड, जिल्हा माहिती कार्यालय, जिल्हा न्यायालय, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नाशिक) | 15/01/2025 | |
| 3 | मा. धर्मादाय आयुक्त यांचे संकेतस्थळावर(http://Charity.maharashtra.gov.in ) प्रसिद्ध करणे | 15/01/2025 | |
| 4 | निविदा स्विकारणे, कालावधी | 15/01/2025 ते 31/01/2025 | |
| 5 | निविदा स्वीकारणे अंतिम तारीख आणि निविदा उघडण्याची मुदतवाढ तारीख | 31/01/2025 | |
| 6 | निविदा उघडल्यास आदेशानुसार तुलनात्मक तक्ता तयार करणे | 03/02/25 | |
| 7 | मा. धर्मादाय सह आयुक्त नाशिक , यांच्याकडे समितीचा अहवाल सादर करणे | 04/02/25 | |
| 8 | मा. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्फत शासनास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करणे | मा. ध. स. आ. -1 यांच्या मंजुरीनंतर | |

13-1-25

(म. ला. जोगी)
धर्मादाय उप आयुक्त,
नाशिक विभाग, नाशिक

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner